क्र. मापृवि/आठ[र. व का.]/स्था.आ.
११७[क]/म. भत्ता/न. क्र. ५६१/
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट क्र. १, धारावी रोड,
माटुंगा, मुंबई - ४०००१९.

दिनांक :- २७/१०/१९९५.

सुधारपत्र क्र. २०, दिनांक २७/१०/१९९५.

[सर्वसाधारण आदेश क्र. ११७ [क], दि. ३१ मार्च १९८६ करिता]

विषय :- महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या कर्मचाऱ्यांना दि. १ जुलै १९९५ पासून पुढे द्यावयाच्या महागाई भत्त्याचे सुधारित दर.

संदर्भ :- सर्वसाधारण आदेश क्र. ११७[क], दि. ३१ मार्च १९८६ चे सुधारपत्र क्र. १९, दिनांक ८ मे १९९५.

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय एफ.डी. क्रमांक मभवा-११९५/२७/सेवा-१० दिनांक ७ ऑक्टोबर १९९५ अन्वये दिनांक १ जुलै १९९५ पासून शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांना सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता देण्याच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ शासनाच्या आदेशांचे अनुसरण करीत असल्यामुळे मंडळ ठराव क्र. ६६०, दिनांक १८ जुलै १९८७ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारात अध्यक्षांनी सदस्य [प्रशासन]/ सचिव, तांत्रिक सदस्य [निर्मिती], तांत्रिक सदस्य [पारेषण व वितरण] आणि लेखा सदस्य यांच्याशी विचारविनिमय करून खाली निर्देशिलेल्या महागाई भत्त्याच्या सुधारित दरांस मान्यता दिली आहे.

| सुधारित महागाई भत्ता लागू झाल्याची तारीख | सुधारित वेतनश्रेणीतील मूळ वेतन | महागाई भत्त्याचे मासिक सुधारित दर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ जुलै १९९५ | एक] रु. ३,५००/- पर्यंत | १३६ टक्के |
| | दोन] रु. ३,५०१ ते रु. ६,०००/- पर्यंत | मूळ वेतनाच्या १०२ टक्के परंतु किमान रु. ४,७६०/- |
| | तीन] रु. ६,०००/- हून अधिक | मूळ वेतनाच्या ८८ टक्के. परंतु किमान रु. ६,१२०/- |

.....२/-

२] दि. १ जुलै १९९५ पासून पुढे सुधारित दराने लागू होणा-या महागाई भत्त्याच्या रकमेची गणना करताना सुधारित वेतनश्रेणीतील केवळ मूळ वेतन हिशोबात घ्यावे. "वेतन" अशी व्याख्या करण्यात येणारे विशेष वेतन, प्रति-नियुक्ती भत्ता, विशेष पूरक भत्ता, हेवी ड्यूटी भत्ता [अवजड वाहन भत्ता] इत्यादी भत्ते महागाई भत्त्याचा विचार करताना हिशोबात धरू नयेत.

३] महागाई भत्त्याच्या रकमेचे प्रदान करताना ५० पैसे किंवा त्याहून अधिक पैशात येणारी रक्कम पुढच्या रुपयाशी पूर्णांकित करण्यात यावी व ५० पैशांहून कमी असणारी रक्कम दुर्लक्षित करावी.

४] उपदान, अतिकालिक वेतन, सर्वसाधारण आदेश क्र. ५१[क], दिनांक २७ जून १९७० च्या तरतुदींअंतर्गत रजेचे रोखीकरण, सेवाविनियम क्र. ३१[क] आणि सर्व-साधारण आदेश क्र. ११४[क], दिनांक २३ ऑगस्ट १९८२ च्या प्रयोजनास्तव, तसेच वेतन व महागाई भत्त्यावर अवलंबून असलेले अन्य कोणतेही प्रदान/वसुली या प्रयो-जनास्तव या सुधारपत्राद्वारे लागू होणारा सुधारित दराचा महागाई भत्ता विचारात घ्यावा.

५] सुधारित दरांनुसार महागाई भत्त्याचे प्रदान मंडळाच्या सर्व कर्मचा-यांना नोव्हेंबर १९९५ च्या वेतनापासून सुरु करावे.

६] आणखी असे की, महागाई भत्त्यामध्ये झालेल्या वाढीमुळे १ जुलै १९९५ ते ३० ऑक्टोबर १९९५ पर्यंत ४ महिन्यांची देय थकबाकीची रक्कम कर्मचा-यांना नोव्हेंबर,१९९५ मध्ये रोख स्वरूपात देण्यात यावी.

७] १ जुलै १९९५ रोजी किंवा त्यानंतर एका कार्यालयातून दुस-या कार्यालयात बदली झालेल्या कर्मचा-यांना १ जुलै १९९५ पासून जुन्या कार्यालयातून मुक्त केल्या-च्या तारखेपर्यंतची सुधारित दराने द्यावयाची महागाई भत्त्याची थकबाकीची रक्कम देताना एक नोव्हेंबर १९९५ रोजी ते ज्या कार्यालयात काम करीत आहेत त्या कार्यालयाने द्यावी. एक नोव्हेंबर १९९५ पूर्वी बदलीच्या ठिकाणी हजर होण्याकरिता कार्यमुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांची थकबाकी बदली झालेल्या ठिकाणी देण्यात यावी.

हे आदेश कार्यव्ययी आस्थानेवरील कर्मचा-यांनाही लागू होतील.

27.10.95

[ विनय मोहन लाल ]
सदस्य [प्रशासन]/ सचिव.

प्रत :- प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.